# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/सा.प्र./५१४/२०२५-२६ दि.२१/०१/२०२६

**// कार्यालयीन आदेश //**

सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी **घोडबंदर रोड** येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम सकाळी ७.०० वाजता व एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम सकाळी ७.४५ वाजता तसेच ध्वजारोहणाचा कार्यक्रम महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे प्रांगणात सकाळी ०८.१५ वा. नियोजित आहे. तरी सदर कार्यक्रमांकरीता खालील अधिकारी/कर्मचारी यांना निर्देशानुसार नेमुन दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहुन प्रजासत्ताक दिनांच्या कार्यक्रमांचे कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी /कर्मचारी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन मुकणे.<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्व. बांधकाम विभाग | ➢ **काशिमिरा व घोडबंदर रोड** येथील छत्रपती शिवाजी महाराज व एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे सुशोभिकरण, रंगरंगोटी व रोषणाई करणे.<br>➢ मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणातील पुतळयांची तसेच ध्वजस्तंभाची रंगरंगोटी करुन परिसरात सुशोभिकरण करणे.<br>➢ मिरा मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात ध्वनीक्षेपण यंत्रणेची (साऊंड सिस्टम) व मुख्यालयात रोषणाई संबंधित साहित्याची सर्व व्यवस्था वेळेत तयार करुन ठेवणे. तसेच इतर आवश्यक कामे करणे व सदर कार्यक्रमावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे. |
| २. | श्री.दिनेश कानुगडे<br>महापालिका सचिव<br><br>श्री. कैलास म्हात्रे<br>लिपीक | ➢ राष्ट्रध्वज बांधणी करणे, ध्वजरोहणाची रंगीत तालीम घेणे.<br>➢ शहरातील मा.पदाधिकारी, मा.नगरसेवक/नगरसेविका व प्रतिष्ठीत नागरीक यांना २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनाची निमंत्रण पत्रिका वाटप करणे. |
| ३. | श्रीम.दिपाली जोशी<br>सहा. आयुक्त (शिक्षण) | ➢ २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणाचा कार्यक्रमाचे संपूर्ण सुत्रसंचालन करण्यासाठी राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत गायनासाठी शिक्षक व विद्यार्थी नियुक्ती करणे. सदर कामे वेळेत पूर्ण होणेकरीता संपूर्ण कार्यक्रमावर नियंत्रण ठेवणे. |
| ४. | श्री. नागेश विरकर<br>मुख्य उद्यान अधिक्षक,मिरारोड | ➢ मुख्य कार्यालया मधील प्रांगणातील पुतळयांना स्वच्छ धुवून घेणे.<br>➢ **काशिमिरा व घोडबंदर रोड** येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा, स्वच्छ धुवून घेणे.<br>➢ सदर अश्वारुढ पूर्णाकृती पुतळयासाठी ३ पुष्पहार वेळेवर उपलब्ध करुन देणे.<br>➢ एम.टी.एन.एल. समोरील भारतरत्न डॉ. बाबसाहेब यांचा पुर्णाकृती पुतळा स्वच्छ धुवून घेणे.<br>➢ सदर अश्वारुढ पूर्णाकृती पुतळयासाठी २ पुष्पहार वेळेवर उपलब्ध करुन |

| | | |
|---|---|---|
| | | देणे. |
| ५. | श्री. प्रकाश बोराडे<br>प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी, | ➢ **काशिमिरा व घोडबंदर रोड** येथील छत्रपती शिवाजी महाराज व एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकरिता नमुद ठिकाणी हायड्रोलिक शिडी उपलब्ध करुन देणे.<br>➢ कदायत व ध्वजवंदनासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांसह वेळेवर उपस्थित रहाणे. सदर कामे वेळेत पूर्ण होणेकरीता संपूर्ण कार्यक्रमावर नियंत्रण ठेवणे. |
| ६. | श्री. प्रभाकर म्हात्रे<br>लेखापरीक्षा अधिकारी,<br>(लेखापरिक्षण विभाग) | ➢ शहीद मेजर कौस्तुभ राणे **व माजी सैनिक** यांचे आई-वडील यांना निमंत्रीत करणे व त्यांना कार्यक्रमाचे दिवशी मिरारोड येथून महापालिकेच्या वाहनातून कार्यक्रम स्थळी आणणे व पुन्हा घरी सोडणे. |
| ७. | श्री. सुनिल यादव<br>सहा. आयुक्त,(आस्था.) | ➢ प्रजासत्ताक दिनी आपल्या विभागाच्या अधिनस्त सफाई व शिपाई कर्मचाऱ्याची चॉकलेट व बिस्कीटे वाटपा करिता नेमणुक करणे<br>➢ लिपीक वर्गाची मनपा अधिकारी व कर्मचारीची हजेरी घेण्याकरीता नेमणुक करणे<br>➢ **अधिकारी / कर्मचारी यांची नाश्ता व पाणी ची व्यवस्था करणे**<br>➢ **सर्व अधिकारी/कर्मचारी यांना परिपत्रकान्वये उपस्थित राहणेबाबत कळविणे.** |
| ८. | श्री. राजकुमार घरत<br>जनसंपर्क अधिकारी तथा सिस्टीम मॅनेजर | ➢ सदर कार्यक्रम सोशल मिडीयावर थेट प्रक्षेपण करणे.<br>➢ सदर कार्यक्रमाची फोटोग्राफी करणेकरीता फोटोग्राफर उपलब्ध करणे.<br>➢ प्रजासत्ताक दिनाचे परिपत्रक महानगरपालिकेच्या वेबसाईटवर तसचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दी देणे. |
| ९. | १. श्रीम. लॉरेटा घाटगे<br>प्रभाग अधिकारी प्रभाग क्र.२<br>२. श्री. कुमार तंगवेल (स.का)<br>श्री. परशुरामसिगांराम (स.का.)<br>श्री. राजेंद्र अय्यातोरे (स.का) | ➢ ध्वजाचे रक्षण करणे व ध्वज सुर्यास्तास उतरविला जाईल याची दक्षता घेणे. संपूर्ण कार्यक्रमावर नियंत्रण ठेवणे. |
| १०. | १. श्री.योगेश गुणिजन,<br>सहा.आयुक्त,<br>२. श्री.प्रकाश पवार<br>स्वच्छता अधिकारी<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग | ➢ **काशिमिरा व घोडबंदर रोड** येथील छत्रपती शिवाजी महाराज व एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाजवळील परिसरात स्वच्छता **व साफसफाई** ठेवणे.<br>➢ मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात व प्रांगणात स्वच्छता व साफसफाई ठेवणे. |

वरील प्रमाणे सोपविलेले कामकाज वेळेत पुर्ण करण्याबाबत विनंती आहे.

२४.०१.२०२६

**(सुनिल यादव)**
**सहा. आयुक्त (सा.प्र.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. उप-आयुक्त (मु.) यांचे मान्यतेने)**

**प्रत माहितीस्तव :**

**१) मा. आयुक्त**
**२) मा. अतिरीक्त आयुक्त (सर्व)**
**३) मा. उपायुक्त (सर्व)**
**४) मा. विभागप्रमुख/सहा.आयुक्त १ ते ६ (सर्व)**